# अर्थसंकल्प 2026 आणि भारत-अमेरिका करार

## "लोकप्रिय पण उद्देशपूर्ण अर्थसंकल्प : अक्षत खेतान

मुंबई, आज सादर करण्यात आलेला केंद्रीय अर्थसंकल्प विकसित भारत घडवण्याच्या दिशेने सरकारची ठाम आणि स्पष्ट भूमिका दर्शवतो. सातत्यपूर्ण, अनुकूलनक्षम आणि भविष्यमुखी संरचनात्मक सुधारणांवर आधारित हा अर्थसंकल्प भारताच्या सुमारे ७% विकासदराला गती देतो, गरिबी कमी करण्यावर भर देतो आणि सरकारी योजनांचा थेट लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करतो. आकांक्षांना यशात आणि क्षमतेला कार्यक्षमतेत रूपांतरित करण्याचा हा अर्थसंकल्पाचा मुख्य उद्देश आहे. विकसित भारत संवाद आणि युवा शक्तीवर आधारित दृष्टिकोन यावर आधारित हा अर्थसंकल्प तीन प्रमुख कर्तव्यांवर उभा आहे—आर्थिक विकासाला गती देणे व टिकवून ठेवणे, लोकांच्या आकांक्षा पूर्ण करत क्षमता निर्माण करणे आणि सबका साथ, सबका विकास या दृष्टीकोनाशी सुसंगत समावेशक विकास साधणे. AU कॉर्पोरेट अ‍ॅडव्हायझरी अँड लीगल सर्व्हिसेस, संस्थापक-अक्षत खेतान म्हणाले.

या अर्थसंकल्पाची मोठी ताकद म्हणजे सतत विकसित होणाऱ्या संरचनात्मक सुधारणांवर दिलेला भर. विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) फोर्स मल्टिप्लायर म्हणून वापर, तसेच केंद्र–राज्य पातळीवरील नियमन शिथिलीकरणाचे प्रयत्न सरकारचा आधुनिक व व्यवहार्य धोरणात्मक दृष्टिकोन अधोरेखित करतात. उत्पादन व औद्योगिक क्षेत्रात मांडलेले धोरणात्मक हस्तक्षेप चॅम्पियन MSME घडवणे, दीर्घकालीन स्थैर्य निर्माण करणे, पायाभूत सुविधा बळकट करणे आणि भविष्यातील विकासासाठी शहरांचे इकोसिस्टम विकसित करण्यावर केंद्रित आहेत.

"भारत-अमेरिका व्यापार करार हा दोन्ही राष्ट्रांसाठी एक बहुप्रतिक्षित आणि महत्त्वपूर्ण टप्पा आहे, जो गुंतवणूक आणि विकासासाठी प्रचंड संधी उपलब्ध करून देईल. मुक्त व्यापार करारांची ही मालिका जागतिक चौकटीमध्ये भारताच्या मध्यवर्ती भूमिकेची पुष्टी करते, ज्याचा उद्देश लवचिक आंतरराष्ट्रीय व्यापार पद्धती निर्माण करणे हा आहे."



**-सुनील भारती मित्तल**

संस्थापक आणि अध्यक्ष, भारती एंटरप्रायझेस